

पथनाट्य सादर केल्यानंतर 'ड्रामा क्लब बिट्स' गोवाचे विद्यार्थी.

# मुलांवरील अत्याचाराविरोधात पथनाट्यातून जनजागृती

## 'ड्रामा क्लब बिट्स गोवा' संस्थेचा उपक्रम

पणजी, ता. १९ (प्रतिनिधी) : लहान मुलांवर होणाऱ्या लैंगीक अत्याचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी 'ड्रामा क्लब बिट्स गोवा' या संस्थेतर्फे पणजी बाजारपेठेत पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली. आयुष आनंद यांनी दिग्दर्शित केलेले ऐलान नावाचे पथनाट्य पाहण्यासाठी बाजारपेठेत शेकडो लोकांनी आपली हजेरी लावली होती.

लहान मुलांच्या लैंगीक अवयवांना हात लावणे किंवा त्यांच्या शरीरासोबत कुहेतूने खेळणे, यासारखे प्रकार आपल्या आजूबाजूला होत असतात. हे प्रकार म्हणजे कायद्याने गुन्हा असून यामुळे मुलांच्या मनावर वाईट परिणाम होत जातात आणि ती निराश राहतात. ज्याचा संपूर्ण परिणाम त्यांच्या बौद्धिक जडणी-घडणीवरही होतो. त्यामुळेच असे प्रकार थांबवा, असे भाष्य करणारे हे पथनाट्य होते.

आम्ही गेल्या दहा वर्षांपासून विविध विषयांवरील पथनाट्ये करीत आहोत. सामाजिक भान जागरूक करण्यासाठी दरवर्षी एक विषय निवडून वर्षभर पथनाट्याच्या माध्यमातून त्यासाठी जनजागृती करतो. आमच्या गटामध्ये एकूण १३ विद्यार्थी असून आम्ही समाजसेवेसाठी एक खारीचा वाटा म्हणून हा उपक्रम चालू केला आहे, असे मत हरिहर नावाच्या विद्यार्थ्याने व्यक्त केले.

हे पथनाट्य पणजी बाजारपेठेचे वातावरण बदलून सर्वांना विचारमग्न करणारे ठरले. सर्व लोक शांतपणे हे पथनाट्य बघत होते. पथनाट्य संपल्यानंतर सर्वांनी टाळ्या वाजवून या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अनेकांनी त्यांची भेट घेऊन त्यांनी उचललेल्या समाजसेवेच्या व्रताचे कौतुकही केले.

Scanned by CamScanner